ಒಟ್ಟು ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 26 ] [ ಒಟ್ಟು ಮುದ್ರಿತ ಪುಟಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 4
Total No. of Questions : 26 ] [ Total No. of Printed Pages : 4

**ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : 450-M (RS)**
**Code No. : 450-M (RS)**

# ಡಿ.ಎಲ್.ಎಡ್. ದ್ವಿತೀಯ ವರ್ಷ
# D.El.Ed. SECOND YEAR
# ಕಲಿಕೆಯನ್ನು ಅನುಕೂಲಿಸುವುದು (ಹಿ.ಪ್ರಾ.ಶಾ.)
# ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ – ಮರಾಠಿ
# FACILITATING LEARNING ( HPS )
# FIRST LANGUAGE – MARATHI

(ಪರಿಷ್ಕೃತ ಪಠ್ಯವಸ್ತು)
**(Revised Syllabus)**

ದಿನಾಂಕ : 15. 05. 2019 ]
Date : 15. 05. 2019 ]

ಸಮಯ : ಮಧ್ಯಾಹ್ನ 2.00 ರಿಂದ 5.00 ರವರೆಗೆ ] [ ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 60
Time : 2.00 P.M. to 5.00 P.M. ] [ Max. Marks : 60

*ಅಭ್ಯರ್ಥಿಯ ನೋಂದಣಿ ಸಂಖ್ಯೆ*
*Register Number of the Candidate*

***सामान्य सूचना :*** i) प्रत्येक उत्तराचे चिंतन, संघटन करून लिहीण्यास अनकुल व्हावे म्हणुन या पेपरला 3 तास वेळ दिलेला आहे.

ii) प्रत्येक प्रश्नाचे उत्तर दिलेल्या सूचनांप्रमाणे लिहीणे आवश्यक आहे.

**भाग - I**

I. खालील प्रश्नाना **चार** बहुपर्यायी उत्तरे दिलेली आहेत. त्यातील योग्य ते उत्तर निवडुन लिहा. प्रत्येक प्रश्नाला एक गुण आहे. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर लिहीणे आवश्यक आहे : 10 × 1 = 10

1. मानवाच्या मानसिक कृतीना, आलोचनाना आकृतीरूप देणे आणि मार्गदर्शन करणे म्हणजे
(अ) सामाजिक व्यवस्था (आ) भाषा व्यवस्था
(इ) विचार व्यवस्था (ई) कार्य व्यवस्था.

2. मुलाला त्याचे विचार मांडण्यास एक उत्तम व्यासपीठ निर्माण करून देण्याची यांची भूमिका महत्वाची आहे.
(अ) मित्रांची (आ) पालकांची
(इ) सरकारची (ई) शिक्षकांची.

3. विद्यार्थी व शिक्षकांचे नाते असे असले पाहिजे.

(अ) आपुलकीचे (आ) तात्पुरते

(इ) मर्यादित (ई) ज्ञान देण्या पुरते.

4. या भाषेचा शिरकाव तसेच इतर भाषांचा शिरकाव करून माध्यमानी प्रस्तुत केलेले कार्यक्रम लोकप्रिय होत आहेत.

(अ) कन्नड (आ) उर्दू

(इ) तमिळ (ई) इंग्रजी.

5. पाठाच्या पायऱ्यांमध्ये महत्वाची पायरी ही आहे.

(अ) परिशोध घेणे (आ) दृढीकरण करणे

(इ) विवरण करणे (ई) मूल्यमापन करणे.

6. प्राथमिक स्तरावरील मुलांचे माध्यम हे असावे.

(अ) मातृभाषा (आ) राज्यभाषा

(इ) प्रादेशिक भाषा (ई) तिन्हींपैकी नाही.

7. घरी मुलांना भाषा आत्मसात करण्याच्या संधी मिळवायच्या असतील तर घरातील मोठ्या व्यक्तींशी

(अ) नकारात्मक असे संबंध असणे आवश्यक आहे

(आ) सकारात्मक संबंध असणे

(इ) परस्पर दुरावा असणे

(ई) परस्पर सहसंबंध असणे.

8. भाषा कौशल्याची पहिली पायरी ही आहे.

(अ) वाचन (आ) लेखन

(इ) भाषण (ई) श्रवण.

9. आकलनासह केलेले ध्वनी उच्चारण म्हणजे

(अ) श्रवण (आ) वाचन

(इ) भाषण (ई) लेखन.

10. मौखिक अभिव्यक्ति विकसित करण्यास कृती देताना या गोष्टी लक्षात ठेवाव्यात.

(अ) मुले संभाषण करत असताना त्याचे प्रत्याभरण करावे

(आ) सर्व चुका एकाचवेळी निदर्शनास आणून द्याव्यात

(इ) शिक्षकांने स्वतः मौखिक अभिव्यक्तिचा उत्तम नमूना द्यावा

(ई) मुलांना आपला अभिप्राय समजून घेण्यास संधी देवू नये.

**भाग - II**

II. खालीलपैकी कोणत्याही **पाच** प्रश्नांची उत्तरे लिहा. ( प्रत्येक प्रश्नाला **दोन** गुण ) : 5 × 2 = 10

11. भाषा व इतर विषय शिक्षकांचा समन्वय कसा असावा ?
12. खाली दिलेल्या व्याकरण अध्ययनाच्या पायऱ्या क्रमवार मांडा.
    1) उपयोगिलेल्या नियमांचे सामान्यीकरण
    2) भाषेचा उपयोग
    3) पुढे विकास करण्याचा उपयोग
    4) उपयोगाबाबत जागृती.
13. चिंतन आणि संभाषण ही भाषेची माध्यमे म्हणून कार्य करतात – थोडक्यात सांगा.
14. मौनवाचन म्हणजे काय ?
15. मुलाला वर्गातील अनुभव हे कोणती समर्थ्ये आत्मसात करण्यास सहाय्यक ठरतात ?
16. भाषेचा उत्तम शिक्षक होण्यास कोणते गुण आवश्यक आहेत ?
17. मुलांना कथा सांगण्यापूर्वी कोणती तयारी करावी ?
18. तुम्ही एक शिक्षक या नात्याने वाचनाचे मूल्यमापन कसे कराल ?

**भाग - III**

III. खालील प्रत्येक प्रश्नात निवड दिलेली आहे. त्यातोल एका प्रश्नाचे उत्तर लिहा. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर किमान एक पृष्ठ असावे. ( प्रत्येक प्रश्नाला **पाच** गुण ) : 8 × 5 = 40

19. अ) भाषा अध्ययनामुळ इतर विषयांच्या अध्ययनास मदत होते. कसे ते स्पष्ट करा.

**किंवा**

आ) भाषा अध्ययनात शिक्षकाची आणि विद्यार्थ्यांची भूमिका स्पष्ट करा.

20. अ) भाषा वर्गात मुलांना व्याकरण अध्यापन कसे करावे ? स्पष्ट करा.

**किंवा**

आ) मुलाला त्याच्या घरच्या भाषेतून शाळच्या भाषेत रूपांतर करण्यास शिक्षकांने कोणते प्रयत्न केले पाहिजेत ?

21. अ) श्रवणातून आनंद मिळविण्यासाठी कोणकोणते उपक्रम शाळेत राबविता येतील ?

**किंवा**

आ) विद्यार्थ्यांचे श्रवण सामर्थ्य समजून घेण्यास काय केले पाहिजेत ?

22. अ) वाचन कौशल्य विकासासाठी शाळेत शिक्षक या नात्याने कोणते उपक्रम राबवाल ?

**किंवा**

आ) विद्यार्थ्यांकडून प्रकट वाचन करून घेताना शिक्षकांने कोणकोणत्या बाबी लक्षात घेतल्या पाहिजेत ?

23. अ) मुलांचे हस्ताक्षर सुधारण्यासाठी शाळेत शिक्षकांने कोणते उपाय योजले पाहिजेत ?

**किंवा**

आ) 'ऐकावे जनाचे करावे मनाचे' या कल्पनेचा विस्तार करा.

24. अ) लेखन प्रक्रियेच्या पाच पायऱ्या स्पष्ट करा.

**किंवा**

आ) विद्यार्थ्यांना वाक्यरचना कशी करावी. हे शिकविताना विकसित झालेली वाक्ये आणि वाक्यात समाविष्ट केलेल्या कृतीचे महत्व सांगा.

25. अ) मराठी भाषच्या अध्यापकाने प्रयत्न करून दूर करावयाच्या भाषण कौशल्यातील उणिवा कोणत्या ? स्पष्ट करा.

**किंवा**

आ) वाचनाची अनुकूलता निर्माण करताना शिक्षकांने कोणते अंश लक्षात ठेवले पाहिजेत ?

26. अ) 5E मधील विवरण ( Explain ) या पायरीत तुम्ही कोणकोणत्या कृती घ्याल ? उदाहरणासह स्पष्ट करा.

**किंवा**

आ) माहिती तंत्रज्ञानाच्या युगात सर्वांच्या विकासात सहभागी होणारी प्रजा तयार करण्यात शिक्षक या नात्याने काय कराल ?